INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 6 | JULY - 2023

# सातवीच्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या हिंदी व्याकरणातील अडचणी

गिरी दत्तात्रय संदिपान
सहशिक्षक,
जि. प. के. प्राथमिक शाळा, एकुरगा, ता. जि. लातूर.

## प्रस्तावना




आजच्या काळात शैक्षणिक क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहे. आजच्या 21 व्या शतकात शैक्षणिक युग पुर्णपणे बदलून गेले आहे. शैक्षणिक क्षेत्रात व शालेय दैनंदिन कार्यात कृतिसंशोधनाची फार मोठी गरज आहे. शिक्षकांनी आपल्या समस्या स्वत: सोडविण्यासाठी केलेली शास्त्रीय प्रक्रिया म्हणजे कृतिसंशोधन होय.

कृतिसंशोधनाचे प्रवर्तक डॉ. कोरे यांच्या मते आपले निर्णय व उपक्रम यांच्या बाबतीत मार्गदर्शन मिळावे. त्यात सुधारणा व्हाव्यात व त्यांचे योग्य तऱ्हेने मुल्यामापन व्हावे म्हणुन व्यावसायिकांनी आपल्या समस्येचा वैज्ञानिक पध्दतीने स्वत:च्या अभ्यास करण्याचा प्रयत्न म्हणजे कृतिशोधन होय.

इतर क्षेत्राप्रमाणे शैक्षणिक क्षेत्रात शिक्षकांनी अध्यायन-अध्यापनात भौतिक सुविधांबाबत विद्यार्थ्यांना कोणऱ्या समस्या येतात. याचे संशोधन करायचे असते. महाराष्ट्र राज्य हे अहिंदी राज्य म्हणुन ओळखले जाते आणि म्हणुन हिदीला मिळाले आहे. या कारणामुळेच हिंदी विषय लेखनात, बोलण्यात विद्यार्थ्यांना अनेक समस्या येतात.

भाषा व्याकरणापासून तयार होते. विद्यार्थ्यांना व्याकरणातील कित्येक घटक समजतच नसल्याने त्यांना शास्त्रशुध्द भाषा (हिंदी) बोलताना व लिहिताना अनेक समस्या निर्माण होतात. त्यामुळेच विद्यार्थ्यांना व्याकरणातील घटक समजण्यामध्ये योणाऱ्या समस्याचा शोध घेण्यासाठी व त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी कृतिसंशोधन ही काळाची गरज आहे.

## पुर्वतयारी

1) हिंदी ही भाषा राष्ट्रभाषा असून त्याविषयी विद्यार्थ्यांच्या मनामध्ये ती अवघड आहे हे पाहिले.
2) विद्यार्थ्यांच्या गृहपाठ व वर्गपाठाच्या वह्यांची बारकाईने तपासणी केली.
3) विद्यार्थी कोणत्या प्रकारच्या चुका करतात हे पाहिले.
4) विद्यार्थ्यांनी गृहपाठ काळजीपूर्वक लिहिणे गरजेची आहे, ते लिहितात का हे पाहिले.
5) विद्यार्थी लेखनामध्ये व्याकरणाच्या कोणत्या चुका अधिक करतात हे पाहिले.
6) विद्यार्थ्यांना काळ या संकल्पनेचा पुर्ण बोध आहे का हि पाहिले.
7) विद्यार्थ्यांना काळ हा प्रकार समजावा म्हणुन विविध शैक्षणिक साधने तयार केली.
8) विद्यार्थ्यांना हिंदी लेखनाचा सराव दिला.

## वरील बाबी संशोधनाची पुर्वतयारी म्हणुन केल्या.

## संशोधनाची उद्दिष्टे

जेव्हा कृतिसंशोधनासाठी एखादा प्रकल्प हाती घेतला जातो तेंव्हा त्याची उद्दिष्टांमुळे संशोधनाच्या जणू चतु:सीमाच निश्चित केल्या जातात.

उद्दिष्टनिश्चित केल्याने संशोधनाची दिशा चुकत नाही. संशोधन व संशोधक दोन्ही भरकटत नाही. तसेच उदिष्टे निश्चित केल्यामुळे अपुर्णतेचा दोष राहत नाही. उद्दिष्टे निश्चितीमुळे संशोधनाची उपयुक्तता यथार्थत वाढते. यासाठी कृतिसंशोधनाची उद्दिष्टे निश्चित करणे गरजेचे आहे.

### संशोधकाने केलेल्या संशोधनाची उद्दिष्टे पुढिलप्रमाणे

1) हिंदी मधील भुतकाळाचे प्रकार अचुक ओळखता येण्यासाठी समस्येचे सोडवणुक करणे.
2) जि. प. प्रा. शाळा एकूरगा लातूर येथील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांना हिंदीतील भुतकाळ व भुतकाळाचे प्रकार ओळखता न येणाऱ्या विद्र्थ्यांचा शोध घेणे.
3) हिंदी मधील भुतकाळाचे प्रकार ओळखतांना येणाऱ्या अडचणीचा शोध घेणे.
4) हिंदी मधील भुतकाळाचे प्रकार ओळखतांना न येणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.
5) हिंदीमधील भुतकाळाचे प्रकार ओळखतांना येणाऱ्या अडचणीचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचविणे.

अशाप्रकारे सदरच्या संशोधनासा संशोधिकेने वरील वरील उद्दिष्टे ठविलेली आहेत.

### संशोधनाची परिकल्पना

परिकल्पना म्हणजे आपल्या संकल्पनेचे अनुभव अभ्यास आणि तर्क ह्या तीन गोष्टिवरून काढलेले उत्तर

1) हिंदी व्याकरणातील भुतकाळाचे उपप्रकार इ. 7 वी च्या विद्यार्थ्यांना समजावून दिले तर त्यांच्या संपादनात लक्षणीय सुधारणा होईल.
2) हिंदी व्याकरणातील भूतकाळाचे प्रकार यामध्ये विविध वाक्य तयार करण्याचा सराव दिला तर व्याकरणदृष्ट्या अचूक लेखन करून शकतील.

अशा प्रकारे सदरच्या संशोधनासाठी संशोधिकेने परिकल्पना मांडलेल्या आहेत.

### संशोधनाची गरज व महत्व

**गरज :-**

आजच्या काळात शैक्षणिक क्षेत्रात झपाट्याने बदल आहेत आहे. आजच्या 21 व्या शतकात शेक्षणिक युग पुर्ण बदलून गेले आहे. शिक्षण क्षेत्रातील जुन्या संकल्पना मागे पाडून नव्या संकल्पना उद्यास येत आहेत.

भाषा व्याकरणापासून तयार होते. विद्यार्थ्यांना व्याकरणातील कित्येक घटक समजत नसल्याने त्यांना शास्त्रशुध्द भाषा (हिंदी) बोलताना व लिहिताना अनेक समस्या निर्माण होतात. त्यामुळेच विद्यार्थ्यांना व्याकरणातील घटक समजण्यामध्ये येणाऱ्या समस्येचा शोध घेण्यासाठी व त्यावर उपाययोजना सुचविण्यासठी संशोधन ही काळाची गरज आहे. त्याच प्रमाणे अभ्यासक्रमातील पुर्वीचे विषय व नव्याने समावेश केलेले विषय यांचे अध्ययन अध्यापन य संदर्भात अनेक समस्या निर्माण असतात. म्हणुन या समस्याचा शोध घेणे काळाची गरज आहे.

**महत्व :**

हिंदी राष्ट्रभाषेतून व्याकरणाचे अध्ययन अध्यापन करावी ही आग्रहाची भूमिका तज्ञांची असते. पण त्यासंदर्भात काही समस्या मुलभूत व गंभीर बनत आहेत. त्यापैकी काळाचे उपप्रकार ओळखता न येणे ही एक समस्या होय. ही एक शैक्षणिक समस्या आहे. यामध्येही आणखी काही उप समस्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे

1) विद्यार्थ्यांना काळ ओळखता येत नाहीत.
2) विद्यार्थ्यांना काळाचे प्रकार ओळखता येत नाहीत.
3) विद्यार्थ्यांना काळाचे उपप्रकार ओळखता येत नाहीत.
4) विद्यार्थ्यांना काळाचा बोलीभाषेत चांगला वापर करता येत नाही.

या प्रकरच्या समस्याची सोडवणुक केल्यावर त्याचा फायदा नक्कीच इ. 7 वीच्या विद्यार्थ्यांना होणार आहे तसेच काळाविषयी अधिक ज्ञान मिळणार आहे याचा विचार करूनच संशोधकाने हिंदी व्याकरणातील भूतकाळाचे उपप्रकार ओळखताना येणाऱ्या समस्यां निवडली आहे.

### संशोधकाची व्याप्ती व मार्यादा :

**संशोधकाची व्याप्ती**

1) सदर संशोधनाची व्याप्ती ही हिंदी भाषा अभ्यासातील व्याकरणातील भूतकाळाचे प्रकार ओळखणे या आशयाचा समावेश आहे.
2) सदर कृतिसंशोधनात इयत्ता सातवी वर्गातील विद्यार्थ्यांचा विचार केला आहे.
3) जि.प.क.प्राथमिक एकुरगा इयत्ता सातवी विद्यार्थ्यांची ही व्याप्ती आहे.
4) शैक्षणिक वर्ष 2022-2023 वर्षामध्ये संशोधन केले आहे.

**संशोधनाची मर्यादा :**

1) सदर कृतिसंशोधन हे जि. प. प्रा. शाळा एकुरगा इयत्ता 7 वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांपुरते मर्यादित आहे.
2) सदर संशोधनात हिंदी विषयाच्या व्याकरणातील केवळ भूतकाळ या प्रकारापुरते मर्यादित आहेत.

**संदर्भ पुस्तके :**

1) डॉ. अरविंद दुनाखे, आशययुक्त अध्यापन द्वितीय भाषा हिंदी, नुतन प्रकाशन, पुणे (1998.)
2) डॉ श्री म जोशी आशययुक्तअध्यपनहिंदी शालेय विषय सुविचार प्रकाशन (2005) पुणे.
3) डॉ के पी शहा, सरल हिंदी व्याकरण, अजब पब्लिकेशन्स (2005) कोल्हापूर
4) प्रा प्र दि पुराणिक, हिंदी व्याकरण रचना, प्रदिप महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे.

**संशोधनाची पार्श्वभूमी व कारणे :**

लेखन कौशल्य हे जीवनातील अमूल्य कौशल्य आहे. जर विद्यार्थ्यांना लेखन कौशल्य आत्मसात नसेल तर त्यांना भावी जीवनात अनंत अडचणींना सामोरे जावे लागेल. लेखन हे व्याकरणदृष्ट्या अचूक असले पाहिले. अन्यथा त्याला अर्थ उरणर नाही. काळ हा व्याकरणाचा गाभा आहे. पण मला अध्यापन करीत असताना असे लक्षात आले की, सहावीचे विद्यार्थ्या हे व्याकरणदृष्ट्या अचूक लेखन करीत नाहीत. ते काळाच्या अनंत चुका करतात.

1) विद्यार्थी व्याकरणातील काळ या प्रकारचे अचूक ज्ञान समजून घेत नाहीत.
2) हिंदी व्याकरणातील काळ हा भाग विद्यार्थ्यांना व्यवस्थीत आकलन झाला नाही.
3) विद्यार्थ्यांना भावी आयुष्यात जीवन जगण्यासाठी भाषेवर प्रभूत्व असणे गरजेचे आहे. व्याकरणाशिवाय भाषेचया वापरला अर्थ नाही.
4) जि. प. प्रा. शाळा एकुरगा येथील इयत्ता 7 वीचे विद्यार्थी भूतकाळाचा वापर करीत नाही. वरील कारणामुळे संशोधन करण्याचे ठरविले.